संच : क **४ थी मराठी**

**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.**

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**

**शैक्षणिक प्रगती चाचणी**

**पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - चौथी**

**विषय : मराठी (लेखी)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________

**शाळेचे नाव :** ______________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** ____ **शिक्षकाची स्वाक्षरी** __________ **एकूण गुण :** ३०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.

नानाकाका घुंगूरकाठी आपटत शेताच्या बांधावरून फिरत होते. वाऱ्यावरून डोलणारी समोरची शेती पाहून ते आनंदाने डोलत होते. निबर, सोन्यासारखे पिवळे भाताचे पीक! नंतर कापणी, झोडणी, मळणी आणि मग कणगीत पडेल वर्षभराची बेगमी, असा विचार त्यांच्या मनात येत होता.

'निसर्गाने करुणा केली, भाते पिकुनी पिवळी झाली,' असे गाणे गुणगुणत नानाकाका माळावरच्या शेतापाशी थांबले. दाणे भरलेल्या लोंब्या आडव्या पडल्या होत्या. शेताची नासाडी चालू होती. शेतावर उंदीरमामा कोपले होते. नानाकाकांनी एक प्रयोग करण्याचे ठरवले. त्यांनी शेताजवळच्या माळावर एक मोठा गोल खड्डा खणला. त्या खड्ड्यात पत्र्याचे एक मोठे पिंप ठेवले. ते अर्धेअधिक पाण्याने भरले. त्याच्या मोकळ्या तोंडावर एक तरफेसारखी हलकी लांब फळी बसवली. पिंपावरच्या फळीच्या टोकाला तळलेली भजी ठेवली. अंधार पडला आणि नानाकाका शेतावरून घरी आले.

**प्रश्न २.** शेताची नासाडी कोण करत होते? (गुण १)

______________________________

**प्रश्न ३.** शेतात कशाचे पीक होते? (गुण २)

अ) ज्वारी

ब) भात

क) गहू

**प्रश्न ४.** नानाकाकांना पीक पाहून आनंद झाला का? (गुण २)
हे तुला उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून समजले ते लिही.

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न ५ ते ७ साठी :** खालील जाहिरात वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

### या मुलांनो या रे या, लवकर सारे नाटक पहा!

**धमाल विनोदी बालनाट्य – मजेशीर ठेंगू पहायला विसरू नका.**

**मजेशीर ठेंगू चौकस बंडू**

**उद्या सोमवार दि. १५ मे**
**दुपारी - २.३० वाजता**
**स्थळ - रंगारंग नाट्यगृह**
**बेलापूर**

**लेखक – द. ग. विसपुते**
**दिग्दर्शक – म. रा. रांगणे**
**निर्मिती – मो. द. पवळे**
**कलाकार – बारा तडाखेबाज बालकलाकार व एक ठेंगू**

**◉ तिकिट विक्री नाट्यगृहावर रात्री ८ वाजेपर्यंत आजच तिकिट खरेदी करा. दर रु. ४०/रु.२०**

**प्रत्येक तिकिटावर एक कार्टून चित्र चक्क मोफत!**

**प्रश्न ५.** जाहिरात कशाची आहे? (गुण १)

अ) बालजत्रा ब) बालनाट्य क) पुस्तक प्रदर्शन

**प्रश्न ६.** नाटक कोणासाठी आहे? हे तुला कशावरून कळते? (गुण २)

______________________________

______________________________

**प्रश्न ७.** आजच तिकिट खरेदी करा, असे जाहिरातीत कशामुळे सांगितले असेल? उद्या तिकिट खरेदी केले तर चालेल का? (गुण २)

______________________________

______________________________

## संच : क

**प्रश्न ८.** खालील वाक्यात ज्या शब्दाखाली रेघ मारली आहे त्या शब्दासाठी समानार्थी शब्द वापर आणि वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

हमीद नियमित व्यायाम करतो.

______________________________

**प्रश्न ९.** खालील वाक्यात ज्या शब्दाखाली रेघ मारली आहे त्या शब्दासाठी विरुद्धार्थी शब्द वापर आणि वाक्य पुन्हा लिही. लक्षात ठेव, वाक्याचा अर्थ बदलू नकोस. (गुण १)

परिसर स्वच्छ ठेवावा.

______________________________

**प्रश्न १०.** गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द लिही. (गुण १)

झाडांवर पक्ष्यांची ____________ ऐकू येत होती.

(किलबिल, म्याँव-म्याँव, बें-बें)

**प्रश्न ११.** गाळलेल्या जागी कंसातील योग्य शब्द लिही. (गुण १)

लाकूडतोड्या लाकडाची ____________ घेऊन निघाला होता.

(गड्डी, मोळी, भारा)

**प्रश्न १२.** योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

माझ्या घरची लाकडं फोडून दे मग देतो तुला भाकर

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न १३.** खालील चित्र पहा आणि त्यावर एक गोष्ट लिही. (गुण ५)

चप्पला शिवणारे आजोबा उन्हात काम करत असतात. शाळेतून जाणाऱ्या एका मुलाच्या घोळक्याचे दररोज त्यांच्याकडे पाहणे.

## संच : क

**प्रश्न १४.** खाली एका गोष्टीची सुरुवात दिली आहे ती गोष्ट पूर्ण कर. (गुण ५)

आजीच्या हातात रसरशीत जांभळांची टोपली होती. सर्व मुलांच्या नजरा त्याच्यावरच रोखल्या होत्या. सगळ्यांना भरपूर जांभळं हवी होती. पण...

■■■



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 4th \Proof-II\19-06-17\G